दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। मंगळवार, दि. १४ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १६ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

अमृत' योजनेतील नळांना तातडीने तोट्या बसवा!

(पान २ वर)



» Selected

## जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त १५ जुलैला रोजगार मेळावा;

**जळगाव :** जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव, मॉडेल करिअर सेंटर आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यात इलेक्ट्रिकल क्षेत्रातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी २०७ हून अधिक रिक्त पदे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. जैन इरिगेशन प्रा. लि., स्पेक्ट्रम इलेक्ट्रिकल्स प्रा. लि., छबी इलेक्ट्रिकल्स प्रा. लि., रेमंड प्रा. लि., लिग्रण्ड प्रा. लि., ॲस्टीमो प्रा. लि., एडीको प्रा. लि. (पुणे) तसेच आकाशवाणी, जळगाव यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

### कलम १५५च्या गैरवापरावर सरकारचा मोठा दणका

# महसूल विभागातील 15 अधिकारी निलंबित!

## जमिनींच्या मालकी हक्कात नियमबाह्य फेरफार, फायली गायब केल्याचाही संशय

जन सम्राट टाईम्स

**पुणे । महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम १५५चा कथित गैरवापर करून जमिनींच्या मालकी हक्कात नियमबाह्य फेरफार केल्याप्रकरणी राज्य सरकारने महसूल विभागातील अधिकाऱ्यांविरोधात मोठी कारवाई केली आहे.**

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानंतर राज्यातील १५ महसूल अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून, या निर्णयामुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे. महसूल प्रशासनातील नियमबाह्य निर्णय, अधिकारांचा गैरवापर आणि नागरिकांच्या तक्रारींना सरकारने गांभीर्याने घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.महसूल विभागाच्या प्राथमिक चौकशीत संबंधित अधिकाऱ्यांनी कलम १५५ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करताना कायद्यातील तरतुदी व प्रशासकीय प्रक्रियेचे पालन केले नसल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणांची विभागीय चौकशी सुरू असून चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल संहितेतील कलम १५५चा उद्देश



महसुली अभिलेखांतील शुद्धलेखन, टंकलेखन किंवा लिपिकीय चुका दुरुस्त करण्यापुरताच मर्यादित आहे. मात्र, काही अधिकाऱ्यांनी या तरतुदीचा वापर करून जमिनींच्या मालकी हक्कात बदल केल्याचे गंभीर प्रकार समोर आले आहेत. काही प्रकरणांत एका व्यक्तीच्या नावावरील मालमत्ता दुसऱ्याच्या नावावर करण्यासाठी या कलमाचा आधार घेतल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. याशिवाय, काही संवेदनशील प्रकरणांतील मूळ फायलीच गायब झाल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला आहे. या फायली जाणूनबुजून नष्ट करण्यात आल्या किंवा लपविण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात असून, 'प्रशासकीय आणि सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५' अंतर्गत संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या कारवाईनंतर राज्यातील महसूल विभागात मोठी खळबळ उडाली असून, कलम १५५ अंतर्गत यापूर्वी निकाली काढण्यात आलेल्या इतर प्रकरणांचाही फेरआढावा घेतला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे गेल्या काही वर्षांत झालेल्या महसुली आदेशांची आणि जमीन फेरफार प्रकरणांची पुन्हा तपासणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या कारवाईत जुन्नरचे तहसीलदार रवींद्र सबनीस, नागपूरचे उपजिल्हाधिकारी मधुसूदन बर्गे, धाराशिवचे भूसंपादन अधिकारी श्रीकांत पाटील, वाशीमचे उपजिल्हाधिकारी संजय नागटिळक

### पारदर्शकतेचा सरकारचा संदेश

राज्यातील जमीनविषयक वाद, फेरफार आदेश आणि महसुली प्रशासनातील पारदर्शकता वाढविण्यासाठी सरकारने अलीकडील काळात विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी, नियमबाह्य आदेश आणि अधिकारांच्या कथित गैरवापराची दखल घेत अशा प्रकरणांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे. विभागीय चौकशीचा अंतिम अहवाल आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर पुढील शिस्तभंगात्मक तसेच कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता असून, महसूल प्रशासनातील उत्तरदायित्व अधिक कडक करण्याच्या दिशेने सरकारने निर्णायक पाऊल टाकल्याचे मानले जात आहे.

व गीता गायकवाड, सोलापूरच्या विशेष दंडाधिकारी वैशाली वाघमारे, तहसीलदार एल. डी. शेख, अभय चव्हाण, रंजना वरहंडे, मंडलाधिकारी शरद गाडे, ग्राम महसूल अधिकारी संगीता लांडे, मंडलाधिकारी मल्लप्पा ढाणे तसेच ग्राम महसूल अधिकारी सुजाता रच्चेवार यांच्यासह विविध जिल्ह्यांतील एकूण १५ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## लाडकी बहीण योजनेच्या खर्चावरून राजकीय रणकंदन

### रोहिणी खडसेंचा सरकारला सवाल

जन सम्राट टाईम्स



**मुंबई | प्रतिनिधी:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वाढत्या खर्चावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी या योजनेच्या खर्चावरून राज्य सरकारवर निशाणा साधत, "लाडक्या बहिणींवरील वाढता खर्च सरकारला जड होऊ लागला आहे का?" असा सवाल उपस्थित केला आहे. माध्यमांशी संवाद साधताना रोहिणी खडसे यांनी दावा केला की, सरकारमधीलच काही व्यक्तींकडून लाडकी बहीण योजनेवरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याची माहिती समोर येत आहे. यापूर्वी या योजनेसाठी सुमारे २६ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता, मात्र आता हा खर्च वाढून जवळपास ३२ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. या वाढीमुळे सुमारे साडेसहा ते सात हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडल्याचा दावा करत रोहिणी खडसे यांनी सरकारच्या आर्थिक नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत, "लाडक्या बहिणींना दिले जाणारे आर्थिक सहाय्य सुरू ठेवण्याबाबत सरकारची भूमिका काय आहे? वाढता खर्च सरकारला अडचणीचा ठरत आहे का?" असा सवाल केला. माध्यमांशी संवाद साधताना रोहिणी खडसे यांनी दावा केला की, सरकारमधीलच काही व्यक्तींकडून लाडकी बहीण योजनेवरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याची माहिती समोर येत आहे.दरम्यान, रोहिणी खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनाही आवाहन केले. "महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींच्या पाठीशी त्यांनी ठामपणे उभे राहावे आणि या योजनेबाबत स्पष्ट भूमिका मांडावी," असे त्यांनी म्हटले. रोहिणी खडसे यांच्या वक्तव्यानंतर लाडकी बहीण योजनेच्या निधी, लाभार्थी संख्या आणि आर्थिक भार या मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये पुन्हा आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू होण्याची शक्यता आहे.

## इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी कर्ज योजनांचा लाभ घ्या!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी** :महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, जळगाव जिल्हा कार्यालय तसेच महामंडळाच्या विविध उपकंपन्यांमार्फत इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध कर्ज, व्याज परतावा आणि कौशल्य विकास योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आलेले सर्व भौतिक व आर्थिक उद्दिष्टे १०० टक्के पूर्ण करण्याचा महामंडळाचा मानस आहे. महामंडळामार्फत संत काशिबा गुरव, जगदज्योती महात्मा बसवेश्वर, संत सेनाजी महाराज केशशिल्पी, संत नरहरी महाराज, संत श्री संताजी महाराज, संत श्री रुपलाल महाराज, स्व. विष्णुपंत रामचंद्र दादरे (लोणारी), सोळा कुलस्वामिनी, संत शिरोमणी नामदेव महाराज समस्त शिंपी समाज, संत भोजलिंग काका सुतार, लेवा पाटीदार समाज, सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज तसेच आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ अशा विविध उपकंपन्यांच्या माध्यमातून योजना राबविण्यात येत आहेत.

## निपुण भारत अभियानाचा व्हिडिओ कॉलद्वारे आढावा; विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे सीईओ नायर यांच्याकडून कौतुक

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** निपुण भारत अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या अध्यापनाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी सोमवारी (दि. १३ जुलै) जिल्हा परिषद शाळा, डोंगर कठोरे येथील शिक्षक राहुल वाणी यांच्या वर्गाशी व्हिडिओ कॉलद्वारे थेट संवाद साधला. यावेळी करिश्मा नायर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या अध्ययन स्तराची माहिती घेतली. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या स्तरानुसार प्रश्न विचारून अध्ययन प्रगतीची पडताळणी केली.तसेच त्या दिवसाच्या कृती आराखड्यानुसार कोणते अध्यापन झाले, याची माहिती शिक्षक व विद्यार्थ्यांकडून जाणून घेतली. आढाव्यादरम्यान स्तर ५ मधील विद्यार्थ्यांकडून २० पर्यंतच्या संख्यांचे वाचन करून घेतले. त्यानंतर बिनहातच्याची बेरीज फळ्यावर करून घेत विद्यार्थ्यांच्या गणितीय कौशल्याची चाचणी घेण्यात आली. पुढे प्रगत स्तरातील एका विद्यार्थिनीला १०० पर्यंतच्या दोन अंकी संख्यांची हातच्याची बेरीज करण्यास सांगितले असता तिने अचूक उत्तर दिल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तिचे विशेष कौतुक केले. यानंतर स्तर ५ वरील एका विद्यार्थिनीचे वाचन ऐकून त्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत वर्गशिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रगत गटातील विद्यार्थिनीने जोडाक्षरयुक्त शब्द व वाक्यांचे प्रभावी आणि अचूक वाचन करून दाखवल्याने करिश्मा नायर यांनी तिचे अभिनंदन करत इतर विद्यार्थ्यांनीही तिचा आदर्श घ्यावा, असे सांगितले. व्हिडिओ संवादाच्या शेवटी मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी विद्यार्थ्यांची अध्ययन प्रगती, शिक्षकांचे नियोजन आणि निपुण भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी याबाबत समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता अधिक वृद्धिंगत करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

## चाळीसगावात १९ जुलै रोजी खान्देशस्तरीय अनुसूचित जाती जागृती ऐक्य परिषदेचे आयोजन

### नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्यातील समाजबांधवांना सहभागी होण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**चाळीसगाव | प्रतिनिधी :** खान्देशातील अनुसूचित जाती समाजामध्ये सामाजिक ऐक्य, जागृती आणि संघटन अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी चाळीसगाव येथे खान्देशस्तरीय अनुसूचित जाती जागृती ऐक्य परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक या चारही जिल्ह्यांतील मूलनिवासी बहुजन समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ही परिषद सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चाळीसगाव (जि. जळगाव) येथे आयोजित करण्यात आली आहे. परिषदेत सामाजिक न्याय, संविधानिक हक्क, समाज संघटन, शैक्षणिक प्रगती आणि सामाजिक एकात्मता या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार असून विविध सामाजिक, शैक्षणिक आणि बहुजन चळवळीतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजप्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या परिषदेच्या माध्यमातून अनुसूचित जाती समाजातील युवक-युवती, महिला आणि समाजबांधवांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करण्याबरोबरच समाजातील विविध प्रश्नांवर सामूहिक विचारमंथन करण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. बामसेफ महाराष्ट्र राज्याचे मुख्य राज्य कार्याध्यक्ष सुमित्र अहिरे यांनी खान्देशातील सर्व मूलनिवासी बहुजन समाजातील बंधू-भगिनींना या परिषदेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. सामाजिक ऐक्य आणि संघटन अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असेही त्यांनी नमूद केले. आगामी काळातील सामाजिक चळवळींना दिशा देणारी ही परिषद ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला असून खान्देशातील विविध भागांतून मोठ्या प्रमाणावर समाजबांधव उपस्थित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत तडजोड खपवून घेणार नाही : करिश्मा नायर

### मलेरिया प्रतिबंधासाठी दक्षतेच्या सूचना



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवा अधिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक असून, आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी दिले. जिल्हा परिषदेच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहात सोमवारी (दि. १३ जुलै) आरोग्य विभागाची सर्वसाधारण आढावा बैठक पार पडली. यावेळी करिश्मा नायर यांनी जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या विविध योजना, उपक्रम आणि कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सचिन सांगळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रमेश धापते तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर म्हणाल्या की, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमधून नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांचा दर्जा अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होणे गरजेचे आहे. प्रत्येक तालुका आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य सेवांवर नियमित देखरेख ठेवून सुधारणा करण्यासाठी स्वतः पुढाकार घ्यावा. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया आणि इतर किटकजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. संशयित रुग्णांचे सर्वेक्षण, उपचार यावर विशेष भर देण्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, किशोरींमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या एचपीव्ही (HPV) लसीकरण मोहिमेचा वेग वाढविण्याचे निर्देशही करिश्मा नायर यांनी दिले. पात्र लाभार्थ्यांचे शंभर टक्के लसीकरण पूर्ण करण्यासाठी जनजागृती आणि प्रचार-प्रसिद्धी प्रभावीपणे राबवावी, असे आवाहन त्यांनी आरोग्य यंत्रणेला केले.

### प्रचार-प्रसिद्धी प्रभावीपणे राबवावी

ग्रामीण रुग्णालयांमधून नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांचा दर्जा अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होणे गरजेचे आहे. प्रत्येक तालुका आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य सेवांवर नियमित देखरेख ठेवून सुधारणा करण्यासाठी स्वतः पुढाकार घ्यावा.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## विठुरायाच्या दर्शनाआधीच काळाचा घाला; अपघातात 3 महिला वारकरी ठार

### सासवड-जेजुरी मार्गावरील दुर्घटनेने वारीत शोककळा • मृत तिन्ही महिला मिरज तालुक्यातील

जन सम्राट टाईम्स



**पुणे | प्रतिनिधी:** आषाढी वारीत विठुरायाच्या दर्शनासाठी निघालेल्या वारकऱ्यांवर जेजुरीजवळ काळाने घाला घातला. पुणे जिल्ह्यातील सासवड-जेजुरी मार्गावर वारीतील ट्रकची धडक बसून झालेल्या भीषण अपघातात तीन महिला वारकऱ्यांचा जागीच मृत्यू, तर सहा जण जखमी झाले. या दुर्घटनेमुळे संपूर्ण वारकरी संप्रदायात शोककळा पसरली असून, मृत तिन्ही महिला सांगली जिल्ह्यातील असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातातील ट्रक चालकाचे नाव बालाजी एकनाथ डक असून तो नांदेड जिल्ह्यातील रहिवासी आहे. संबंधित ट्रक हा ताठे महाराज भोशीकर दिंडीचा असल्याचे सांगितले जात आहे. अपघातानंतर चालकाविरोधात पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, दुर्घटनेचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे. या दुर्घटनेबाबत मंत्री संजय शिरसाट यांनी तीव्र दुःख व्यक्त केले. "ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. तीन महिलांचा मृत्यू झाला असून सहा वारकरी जखमी आहेत. अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासन आवश्यक ती खबरदारी घेत आहे. जखमींना तातडीने उपचार मिळावेत आणि मृतांच्या कुटुंबियांना शासनाकडून मदत केली जाईल," असे त्यांनी सांगितले. वारकऱ्यांनीही प्रवासादरम्यान आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर त्यांनी रुग्णालयात जाऊन उपचार घेत असलेल्या जखमी वारकऱ्यांची व त्यांच्या नातेवाईकांची भेट घेतली. जखमींच्या प्रकृतीची माहिती घेत त्यांच्या कुटुंबियांना धीर देताना, "राज्य सरकार मृतांच्या कुटुंबीयांसह जखमी वारकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून दिली जाईल," अशी ग्वाही त्यांनी दिली. आषाढी वारी हा भक्ती, श्रद्धा आणि समर्पणाचा उत्सव मानला जातो. मात्र, जेजुरीजवळ घडलेल्या या भीषण अपघातामुळे संपूर्ण वारकरी संप्रदाय हळहळला आहे. विठ्ठल दर्शनाच्या मार्गावरच तीन वारकरी महिलांचा मृत्यू झाल्याने वारीच्या आनंदावर दुःखाची छाया पसरली असून, जखमी वारकऱ्यांवर उपचार सुरू आहेत. शासनाकडून मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत जाहीर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### सुनेत्रा पवारांची तात्काळ घटनास्थळी धाव

आषाढी वारीत विठुरायाच्या दर्शनासाठी निघालेल्या वारकऱ्यांवर जेजुरीजवळ काळाने घाला घातला. पुणे जिल्ह्यातील सासवड-जेजुरी मार्गावर वारीतील ट्रकची धडक बसून झालेल्या भीषण अपघातात तीन महिला वारकऱ्यांचा जागीच मृत्यू, तर सहा जण जखमी झाले. या दुर्घटनेमुळे संपूर्ण वारकरी संप्रदायात शोककळा पसरली असून, मृत तिन्ही महिला सांगली जिल्ह्यातील असल्याचे समोर आले आहे. अपघाताची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत जखमी वारकऱ्यांची विचारपूस केली. त्यांनी पालखी प्रमुख, पोलीस प्रशासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दुर्घटनेची सविस्तर माहिती घेतली. तसेच जखमींवर तातडीने आणि सर्वोत्तम वैद्यकीय उपचार करण्यात यावेत, तसेच आवश्यक ती सर्व मदत त्वरित उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

# हडसन,परिसरातील अवैध दारूविक्री बंद करा

## राष्ट्रीय भीमसेनेची पोलिसांकडे मागणी; कारवाई न झाल्यास'रास्ता रोको'

जन सम्राट टाईम्स



**पाचोरा | प्रतिनिधी :** पाचोरा तालुक्यातील हडसन, पहान आणि नांद्रा परिसरात सुरू असलेली अवैध गावठी दारूची विक्री तात्काळ बंद करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रीय भीमसेनेचे जळगाव जिल्हाध्यक्ष वाल्मीक लालचंद जाधव यांनी पाचोरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. तसेच, तातडीने कारवाई न झाल्यास संपूर्ण जळगाव जिल्ह्यात 'रास्ता रोको' आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, हडसन, पहान आणि नांद्रा या गावांमध्ये अवैध गावठी दारूची खुलेआम विक्री सुरू असून त्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रावर गंभीर परिणाम होत आहेत. व्यसनाधीनतेमुळे अनेक कष्टकरी कुटुंबे उद्ध्वस्त होत असून ग्रामीण भागातील शांतता आणि सामाजिक वातावरण बिघडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. राष्ट्रीय भीमसेनेने विशेषतः तरुण पिढीच्या भविष्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. गावांतील अनेक युवक व्यसनाच्या आहारी जात असून काही शालेय विद्यार्थीही या विळख्यात अडकत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भविष्य धोक्यात येत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, व्यसनाधीनतेमुळे शेतकरी शेतीकडे दुर्लक्ष करत असून त्याचा परिणाम शेती उत्पादनासह ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे अवैध दारूविक्रीचा प्रश्न हा केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरता मर्यादित नसून सामाजिक आरोग्याशी निगडित असल्याचे राष्ट्रीय भीमसेनेने स्पष्ट केले आहे. निवेदनानुसार, पहान गावात गेल्या सुमारे २० वर्षांपासून दारूबंदी लागू असतानाही नांद्रा–पहान मार्गावर तसेच पहान शिवारात खुलेआम गावठी दारूची विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

स्थानिक नागरिक आणि भीमसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित विक्रेत्यांना अनेकदा समज दिल्यानंतरही काही काळ विक्री बंद करून पुन्हा पूर्ववत व्यवसाय सुरू केला जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित ठिकाणी तातडीने छापेमारी करून अवैध दारूविक्री बंद करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने या मागणीची गंभीर दखल घेतली नाही तर राष्ट्रीय भीमसेनेच्या वतीने संपूर्ण जळगाव जिल्ह्यात 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वाल्मीक लालचंद जाधव यांनी दिला आहे. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी शासन आणि प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या मागणीमुळे पाचोरा तालुक्यातील अवैध गावठी दारूविक्रीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला असून, याप्रकरणी पोलीस प्रशासन कोणती कारवाई करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भविष्य धोक्यात

गावांतील अनेक युवक व्यसनाच्या आहारी जात असून काही शालेय विद्यार्थीही या विळख्यात अडकत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भविष्य धोक्यात येत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, व्यसनाधीनतेमुळे शेतकरी शेतीकडे दुर्लक्ष करत असून त्याचा परिणाम शेती उत्पादनासह ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनानुसार, पहान गावात गेल्या सुमारे २० वर्षांपासून दारूबंदी लागू असतानाही नांद्रा–पहान मार्गावर तसेच पहान शिवारात खुलेआम गावठी दारूची विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# धुळे शहरालगतच्या सुरत बायपास रिंगरोडवर अपघातात

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी :** भरधाव कंटेनरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धुळे शहरातील सुरत बायपास रिंगरोडवरील हॉटेल आदर्शसमोर हा अपघात घडला. कुलकर्णी कुटुंब दुचाकीवरून मालेगावहून धुळ्याकडे येत असताना पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या एका अनियंत्रित कंटेनरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत पुरमेपाडा येथील रहिवासी जितेश ऊर्फ मयुर नंदलाल कुलकर्णी (वय 36) आणि त्यांचा पाच वर्षीय मुलगा खुशाल मयुर कुलकर्णी यांना डोक्यासह शरीरावर गंभीर दुखापत झाली. दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. तर जितेश कुलकर्णी यांच्या पत्नी मोनाली मयुर कुलकर्णी (वय 30) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले. या प्रकरणी कंटेनर चालकाविरुद्ध मोहाडी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अपघाताचे नेमके कारण आणि चालकाची निष्काळजीपणा याबाबत पुढील तपास सुरू आहे. भरधाव कंटेनरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, धुळे शहरातील सुरत बायपास रिंगरोडवरील हॉटेल आदर्शसमोर हा अपघात घडला. दरम्यान, भरधाव वाहनांच्या वाढत्या वेगामुळे वारंवार होणाऱ्या अपघातांबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली असून, संबंधित मार्गावर कडक वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | ब्रेक न्यूज | ज

# पिंप्रीतील मृत्यू प्रकरणात दोन्ही बाजूंनी गुन्हे दाखल!

## महावितरणच्या तिघांवर कारवाई

जन सम्राट टाईम्स



**शहादा। प्रतिनिधी :** शहादा तालुक्यातील पिंप्री येथे वीज मीटर तपासणीदरम्यान झालेल्या वादातून ७८ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याच्या घटनेने गंभीर वळण घेतले आहे. या प्रकरणी एका बाजूला महावितरणच्या तीन कर्मचाऱ्यांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, दुसऱ्या बाजूला वीज चोरी, शासकीय कामात अडथळा आणि महावितरणच्या पथकावर हल्ला केल्याप्रकरणी तीन अज्ञात व्यक्तींविरुद्धही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. वृद्धाच्या मृत्यूप्रकरणी महावितरण कर्मचाऱ्यांवर गुन्हा सुरेश उद्धव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १० जुलै रोजी सकाळी सुमारे ११.१५ वाजता महावितरणचे कर्मचारी तुषार दिलीप पाटील, विजय गहाणे आणि पंकज जगन्नाथ कुंभार हे पिंप्री गावात वीज मीटर तपासणीसाठी आले होते.कैलास पाटील यांच्या घरातील मीटर तपासणी सुरू असताना शेजारी राहणारे नथ्थू लिमजी पाटील (वय ७८) यांनी कर्मचाऱ्यांना विचारणा केली. त्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. फिर्यादीनुसार, या वादादरम्यान कर्मचाऱ्यांनी नथ्थू पाटील यांना धक्काबुक्की केली. पाठीमागून जोराचा धक्का बसल्याने ते काँक्रीटच्या रस्त्यावर पडले. या पडझडीत त्यांच्या डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या फिर्यादीवरून महावितरणच्या तिन्ही कर्मचाऱ्यांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणची प्रतिफिर्याद; वीज चोरी व पथकावर हल्ल्याचा आरोप दरम्यान, महावितरणचे कनिष्ठ अभियंता योगेश मधुकर जाधव यांनीही शहादा पोलीस ठाण्यात स्वतंत्र फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, पथक वीज चोरीविरोधी मोहिमेसाठी पिंप्री गावात गेले असता नथ्थू पाटील यांच्या घरातील वीज मीटर बायपास करून वीज चोरी होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार नियमानुसार पंचनामा व तपासणी अहवाल तयार करण्यात आला. याचवेळी नथ्थू पाटील यांनी पथकाशी वाद घातला आणि ते स्वतःहून खाली पडल्याचा दावा महावितरणने केला आहे. त्यानंतर संतप्त झालेल्या २ ते ३ अज्ञात व्यक्तींनी महावितरणच्या पथकाला घेराव घालत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून काठी तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.सहाय्यक अभियंता विजय कुसुमपुरी गहाणे जखमी झाले असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अज्ञात तिघांविरुद्ध वीज चोरी, शासकीय कामात अडथळा आणि मारहाणीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# विविध मागण्यांसाठी शिवसेना एकलव्य आदिवासी सेलचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स



**पाचोरा। प्रतिनिधी :** शिवसेना एकलव्य आदिवासी सेल, जळगाव जिल्ह्याच्या वतीने सोमवारी (दि. १३ जुलै) पाचोरा उपविभागीय कार्यालयात प्रांताधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात आदिवासी समाजाशी संबंधित विविध प्रश्नांवर प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष धर्मा बाबूलाल भिल यांनी दिलेल्या निवेदनानुसार, आदिवासी (भिल्ल) समाजातील मुलीने ओबीसी किंवा इतर उच्चवर्णीय समाजातील तरुणाशी विवाह केल्यास संबंधित विवाहितेला आदिवासी समाजासाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने स्पष्ट धोरण निश्चित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पाचोरा व भडगाव तालुक्यातील आदिवासी समाजाच्या दफनभूमींची स्थानिक पातळीवर पाहणी करून त्यांची अधिकृत नोंद करावी व आवश्यक तेथे नामफलक लावावेत, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. याशिवाय, भिल्ल आदिवासी समाजातील कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होऊ नये, तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांपासून पात्र लाभार्थी वंचित राहणार नाहीत, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन संघटनेने केले आहे. या निवेदनाची दखल घेऊन संबंधित मागण्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे.

# अमृत-सक्षम'मुळे कचरा (रिसायकलिंग) व्यवस्थापन क्षेत्रात उद्योजकतेची नवी पहाट

## महिला व्यावसायिकांसाठी व्यवसाय उभारण्याची सुवर्णसंधी

जन सम्राट टाईम्स



**जळगाव । प्रतिनिधी :** महाराष्ट्रात कचरा व्यवस्थापन हे केवळ स्वच्छतेचे काम न राहता वेगाने विकसित होणारे हरित उद्योग (GREEN BUSINESS) क्षेत्र बनले आहे. वाढते शहरीकरण, पर्यावरणपूरक धोरणे आणि पुनर्वापर (रिसायकलिंग) उद्योगाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन 'अमृत' आणि 'कुशाग्र इनोव्हेशन्स फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'अमृत-सक्षम' हा विशेष उद्योजकता विकास उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवक-युवती, महिला बचत गट, सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी नागरिक, निवृत्त अधिकारी तसेच विद्यमान व्यवसायाचा विस्तार करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना कचरा व्यवस्थापन क्षेत्रात व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि आवश्यक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. कचऱ्यातून शाश्वत उत्पन्नाचे विविध पर्याय उपलब्ध असून सुकलेल्या फुलांपासून अगरबत्ती व धूपनिर्मिती, प्लास्टिक, कागद आणि काच रिसायकलिंग तसेच रिसोर्स रिकव्हरी सेंटर (RRR) उभारणीसारख्या व्यवसायांमध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. योग्य तांत्रिक ज्ञान, व्यावसायिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेची जोड मिळाल्यास या क्षेत्रात यशस्वी उद्योग उभारता येऊ शकतो. या उपक्रमासाठी कोणत्याही पूर्वानुभवाची आवश्यकता नसून इच्छुकांनी अमृत-सक्षमच्या नोंदणी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा. 'अमृत' आणि 'कुशाग्र इनोव्हेशन्स फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'अमृत-सक्षम' हा विशेष उद्योजकता विकास उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. नोंदणीनंतर पात्र उमेदवारांशी अमृत-सक्षम टीम संपर्क साधून जिल्हानिहाय कार्यशाळा, प्रशिक्षण आणि पुढील प्रक्रियेची माहिती देणार आहे.

यासंदर्भात प्राथमिक माहिती देण्यासाठी १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता AMRUT च्या युट्यूब चॅनेलवर विशेष थेट (लाईव्ह) सत्र आयोजित करण्यात आले आहे. तसेच अधिक माहितीसाठी ७७५७०९१८५९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 'अमृत-सक्षम... सक्षम उद्योजक... स्वावलंबी महाराष्ट्र... शाश्वत भविष्य...!' तसेच 'संधीची वाट पाहू नका, संधी निर्माण करा; आजच हरित क्रांतीचा भाग व्हा!' असे आवाहन अमृत संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालकांनी केले आहे.

# सामान्य कुटुंबातील लेकीची असामान्य भरारी

## कु. पूजा पाटीलचा लिनेस क्लब ऑफ पाचोरातर्फे गौरव

जन सम्राट टाईम्स



**भडगाव । प्रतिनिधी:** अत्यंत सामान्य आणि कष्टकरी कुटुंबातील लेक असलेल्या कु. पूजा पाटील हिने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलात निवड मिळवत यशाचे शिखर गाठले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल लिनेस क्लब ऑफ पाचोराच्या वतीने 'माँ से बेटी सवाई' या उपक्रमांतर्गत तिचा सन्मान करण्यात आला. वडगाव टेक येथील रहिवासी असलेली पूजा पाटील ही श्री शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा येथील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाची विद्यार्थिनी आहे. तिचे आई-वडील रोजंदारीवर मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असूनही पूजाने परिस्थितीसमोर न झुकता सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलात निवड मिळवली. विशेष म्हणजे, ती आपल्या गावातील पहिली महिला पोलीस ठरली आहे. तिच्या या प्रेरणादायी यशाबद्दल लिनेस क्लब ऑफ पाचोराच्या अध्यक्षा प्रा. सौ. जयश्रीताई कोमल वाघ यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल आणि सन्मानचिन्ह देऊन तिचा गौरव करण्यात आला. यावेळी श्रीकृष्ण हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. अनुजा देशमुख, लिनेस क्लबच्या सचिव सौ. सरलाताई पाटील, ज्येष्ठ संचालिका सौ. उज्वलाजी चोरडिया, सौ. पिंकीजी जुनोदिया, सौ. पूजाजी देसाई आणि कु. चेतना हिरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सन्मान सोहळ्यात उपस्थितांनी पूजा पाटीलच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच समाजातील प्रत्येक मुलीने शिक्षण, आत्मविश्वास, शिस्त आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करून यश संपादन करावे, असा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

# अमृत' योजनेतील नळांना तातडीने तोट्या बसवा!

## लाखो लिटर पाण्याची नासाडी थांबवा

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या 'अमृत' योजनेअंतर्गत जळगाव शहरात पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नवीन जलवाहिन्या व घरगुती नळजोडण्या देण्यात आल्या. मात्र अनेक ठिकाणी नळजोडण्या करूनही त्यावर तोट्या बसविण्यात न आल्याने पाणीपुरवठा सुरू होताच शुद्ध पिण्याचे पाणी थेट रस्त्यावर वाहून जात असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे दररोज लाखो लिटर पाण्याची नासाडी होत असून नागरिकांनी जळगाव महानगरपालिकेकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नळांना तोट्या नसल्यामुळे पाणी सुरू झाल्यानंतर ते थेट उघड्या पाईपमधून बाहेर पडते. अनेक भागांमध्ये हे पाणी रस्ते, गटारे आणि घरांसमोर साचत असल्याने चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. सतत पाणी साचत असल्यामुळे नव्याने तयार करण्यात आलेल्या रस्त्यांनाही तडे जाऊन खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. एकीकडे उन्हाळ्यात आणि पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो, तर दुसरीकडे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणावर शुद्ध पिण्याचे पाणी वाया जात असल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण होत असल्याने ही बाब केवळ पाणीपुरवठ्यापुरती मर्यादित नसून आरोग्याचाही गंभीर प्रश्न बनत आहे. नागरिकांनी महानगरपालिका प्रशासन, आयुक्त आणि संबंधित अभियंता विभागाकडे पुढील मागण्या केल्या आहेत. अमृत योजनेअंतर्गत ज्या ठिकाणी नळजोडण्या पूर्ण झाल्या आहेत, त्या सर्व ठिकाणी तातडीने दर्जेदार तोट्या बसविण्यात याव्यात. संबंधित कंत्राटदाराने तोट्या न बसविताच काम पूर्ण झाल्याचा दावा केला आहे का, याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी. एकीकडे उन्हाळ्यात आणि पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो, तर दुसरीकडे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणावर शुद्ध पिण्याचे पाणी वाया जात असल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. ज्या ठिकाणी सध्या पाणी वाया जात आहे, तेथे तात्पुरत्या स्वरूपात प्लग किंवा डमी बसवून पाण्याची नासाडी त्वरित थांबविण्यात यावी. "पाणी हेच जीवन आहे आणि प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे." कोट्यवधी रुपये खर्च करून राबविण्यात आलेल्या अमृत योजनेचे उद्दिष्ट एका छोट्याशा तोटीअभावी धोक्यात येऊ नये. त्यामुळे महानगरपालिकेने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन प्रभावी उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | अँकर न्यूज | ज

# जिल्हा परिषद शाळा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा भक्कम पाया : पालकमंत्री

## १२५ विद्यार्थ्यांना शासकीय गणवेश व जीपीएस ग्रुपकडून वह्यांचे वाटप

जन सम्राट टाईम्स



**पाळधी / जळगाव प्रतिनिधी:** जिल्हा परिषद शाळा हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा भक्कम पाया असून, या शाळांमधून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत यश संपादन करत आहेत. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश देऊन शाळांची पटसंख्या वाढवावी, असे आवाहन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. चोरगाव येथील प्राथमिक विद्यामंदिर जिल्हा परिषद शाळेत आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते १२५ विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. तसेच जीपीएस ग्रुपच्या माध्यमातून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे सर्व १२५ विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, शासन विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देत आहे. विद्यार्थ्यांनी या सुविधांचा योग्य उपयोग करून शिक्षणात प्रगती साधावी. जिल्हा परिषद शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थीही विविध क्षेत्रांत आपली ओळख निर्माण करत आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपशिक्षक भूषण पाटील यांनी केले. सूत्रसंचालन उपशिक्षक रमेश बोरसे यांनी केले, तर मुख्याध्यापक प्रकाश बडगुजर यांनी आभार मानले. यांची होती उपस्थिती यावेळी माजी सरपंच नाना सोनवणे, उपसरपंच प्रवीण पवार, ग्रामपंचायत सदस्य जगन सोनवणे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा वैशाली सोनवणे, उपाध्यक्ष प्रवीण सोनवणे, शिक्षक दारासिंग राठोड, सुनंदा कोळी यांच्यासह पालक, विद्यार्थी आणि शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 125 विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण

चोरगाव येथील प्राथमिक विद्यामंदिर जिल्हा परिषद शाळेत आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते १२५ विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. जीपीएस ग्रुपच्या माध्यमातून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे सर्व १२५ विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306